# AI आणि संस्कृती, कला व मानवविज्ञान: एक अध्ययन

**Prof. Mr. Mangesh Dodke**
Asst. Professor, Dept of History
Nabira Mahavidyalaya, Katol.
Email : mangeshdodke40@gmail.com
Mob : 8999518745

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i2.118

---

**सारांश *(Abstract)* :**

*कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही आजच्या जागतिक समाजरचनेतील एक प्रभावी आणि परिवर्तनकारी संकल्पना आहेत. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रापुरती मर्यादित न राहता AI चा प्रभाव संस्कृती, कला आणि मानवविज्ञान या पारंपरिक मानवी संवेदनांशी निगडित क्षेत्रांवरही स्पष्टपणे दिसून येतो. AI मुळे कलानिर्मिती, सांस्कृतिक जतन, ऐतिहासिक अभ्यास, भाषा, साहित्य, तत्त्वज्ञान व समाजशास्त्र यांसारख्या मानवविज्ञानाच्या शाखांमध्ये नाविन्यता निर्माण झाली आहेत. चित्रकला, संगीत, साहित्य, नाट्य, स्थापत्य आणि वारसा संवर्धन यांसारख्या क्षेत्रांत AI चा वापर वाढत असून मानवविज्ञानाच्या अभ्यासाला गती मिळाली आहे.*

*हा संशोधन लेख AI आणि संस्कृती, कला व मानवविज्ञान यांमधील परस्परसंबंधांचा अभ्यास करतो. AI मुळे सांस्कृतिक वारशाचे जतन, विश्लेषण आणि पुन: सादरीकरण कसे घडते, याचा सखोल विचार करण्यात आला आहे. तसेच सर्जनशीलतेचे स्वरूप, मानवी भूमिका, नैतिक प्रश्न आणि सांस्कृतिक अस्मितेवरील परिणाम यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. निष्कर्षत: AI ही मानवाच्या सर्जनशीलतेची जागा घेणारी शक्ती नसून ती मानवविज्ञानासाठी एक पूरक व विस्तारक साधन ठरू शकते, असा निष्कर्ष मांडण्यात आला आहे.*

**बीजशब्द (Keywords) :** कृत्रिम बुद्धिमत्ता, संस्कृती, कला, मानवविज्ञान, सांस्कृतिक वारसा, डिजिटल मानवविद्या, नैतिकता

---

**प्रस्तावना (Introduction) :**

२१ व्या शतकात कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांवर प्रभाव टाकणारे तंत्र आहे. संगणक, रोबोटिक्स आणि डेटा विश्लेषणाच्या माध्यमातून AI मानवी विचारप्रक्रियेचे अनुकरण करते. सुरुवातीला वैज्ञानिक व औद्योगिक क्षेत्रापुरती मर्यादित असलेली AI आज सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवीय अभ्यासांमध्येही प्रवेश करत आहे. संस्कृती, कला आणि मानवविज्ञान ही क्षेत्रे परंपरेने मानवी संवेदनशीलता, मूल्ये, परंपरा आणि सर्जनशीलतेशी निगडित मानली जातात. मात्र डिजिटल युगात या क्षेत्रांमध्ये AI चा वाढता

हस्तक्षेप, मानवी भूमिका, सर्जनशीलतेची संकल्पना आणि सांस्कृतिक अस्मिता यांबाबत नवे प्रश्न निर्माण करतो. हा लेख AI आणि मानवविद्यांचा परस्परसंबंध समजून घेण्याचा प्रयत्न करतो. AI मुळे संस्कृतीचे जतन व प्रसार कसा होतो? कला क्षेत्रात सर्जनशीलतेचे स्वरूप कसे रूपांतरित होते? आणि मानवविज्ञानाच्या अभ्यासपद्धतींमध्ये कोणते नवे दृष्टिकोन निर्माण होतात, याचे विश्लेषण करणे हा या अभ्यासाचा उद्देश आहे.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधनात गुणात्मक व संकल्पनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. AI, संस्कृती, कला आणि मानव विज्ञान यांच्यावर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील दुय्यम स्रोतांचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासात आंतरशाखीय दृष्टिकोन स्वीकारून इतिहास, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान आणि डिजिटल मानवविद्या यांचा समन्वय साधण्यात आला आहे. उपलब्ध साहित्याचे विश्लेषणात्मक व तुलनात्मक अध्ययन करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. ही पद्धत विषयाच्या सैद्धांतिक व वैचारिक आकलनासाठी उपयुक्त ठरते.

**कृत्रिम बुद्धिमत्त्वेचा विकास :**

कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना २० व्या शतकाच्या मध्यकाळात उदयास आली. १९५६ मध्ये जॉन मॅकार्थी यांनी ‘Artificial Intelligence’ हा शब्द प्रथम वापरला. प्रारंभी AI चा उद्देश मानवी बुद्धिमत्तेचे तर्कशुद्ध मॉडेल तयार करणे हा होता. कालांतराने मशीन लर्निंग, डीप लर्निंग, न्यूरल नेटवर्क्स आणि बिग डेटा यांसारख्या तंत्रज्ञानामुळे AI अधिक प्रगत झाले. AI चा विकास तीन टप्प्यांत समजून घेता येतो: (१) नियमाधारित प्रणाली, (२) डेटा-आधारित शिकणारी प्रणाली आणि (३) स्वयं-अभ्यास करणारी प्रगत प्रणाली. आजची AI केवळ सूचना पाळणारी नसून अनुभवातून शिकणारी आणि सर्जनशील प्रतिसाद देणारी ठरली आहे. याच प्रगतीमुळे मानवविज्ञानासारख्या ‘मृदू’ विषयांमध्येही AI चा वापर सहज शक्य झाला आहे.

**AI: संकल्पना व स्वरूप :**

AI म्हणजे संगणक प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेसारखी क्षमता प्रदान करण्याची प्रक्रिया होय. यात शिकणे, भाषा समजणे, प्रतिमा ओळख आणि निर्णय क्षमता यांचा समावेश होतो. AI ही पूर्णतः स्वायत्त मानवी बुद्धिमत्ता नसून ती मानवी डेटावर आधारित कार्य करते. त्यामुळे तिचे स्वरूप हे मानवकेंद्रित आहे. संस्कृती व कला क्षेत्रात AI चा वापर करताना ही बाब विशेष महत्त्वाची ठरते, कारण सांस्कृतिक मूल्ये व अर्थ मानवी संदर्भाशिवाय अपूर्ण असतात.

**AI आणि भाषा-संस्कृती :**

भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून सांस्कृतिक अस्मितेचे वाहक आहे. AI मुळे भाषांतर, आशय विश्लेषण आणि भाषिक नमुने ओळखणे सुलभ झालेले आहेत. मराठी, संस्कृत तसेच आदिवासी भाषांसाठी NLP आधारित साधने विकसित होत असल्याने दुर्लक्षित भाषांचे जतन करणे शक्य होते. परंतु भाषांतर प्रक्रियेत सांस्कृतिक संदर्भ, बोलीभाषा आणि भावार्थ गमावण्याचा धोका असतो. याकरिता AI चा वापर करताना भाषिक

संवेदनशीलता आणि मानवी तज्ञाचा सहभाग आवश्यक ठरतो.

**AI: लोकसाहित्य व लोकसंस्कृती :**

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती या समाजाच्या जिवंत आठवणी आहेत. अभंग, ओव्या, पोवाडे, लोकगीते आणि मौखिक परंपरा यांचे AI वर आधारित डिजिटायझेशन करून त्यांचे जतन व विश्लेषण करता येते. ध्वनी किंवा प्रतिमा ओळख तंत्रज्ञानामुळे या परंपरांचे दस्तऐवजीकरण अधिक प्रभावी बनले आहे. मात्र, लोकसंस्कृती ही सतत परिवर्तनशील असल्याने ती केवळ संग्रहालयीन वस्तू म्हणून मांडण्याचा धोका आहे. म्हणूनच AI स्थैर्य लादण्यासाठी नाही तर उपयोग जतन करण्यासाठी असावा.

**AI आणि इतिहासलेखन :**

AI मुळे इतिहासलेखनात नव्या संशोधन पद्धती उदयास आल्या आहेत. ऐतिहासिक दस्तऐवज, शिलालेख आणि अभिलेखांचे विश्लेषण AI द्वारे शक्य होत आहे. पॅटर्न ओळख, कालानुक्रमिक विश्लेषण आणि तुलनात्मक अभ्यास यामुळे इतिहासातील दुर्लक्षित प्रवाह स्पष्टपने मांडता येते. परंतु इतिहास हा केवळ डेटाचा संग्रह नसून मानवी विवेक व संदर्भ समज यावर आधारित असल्याने AI इतिहासकाराचे साहाय्यक साधन असायला पाहिजे. पण निर्णायक घटक नसावे, याची दखल घेणे गरजेचे आहेत.

**AI, कला आणि बौद्धिक संपदा :**

AI निर्मित कलाकृतींमुळे बौद्धिक संपदेचे नवे प्रश्न निर्माण झालेले आहेत. एखादी चित्रकला, संगीत किंवा साहित्यकृती AI ने निर्माण केल्यास त्याचे श्रेय आणि हक्क कोणाचे असावेत, हा प्रश्न निर्माण होतो. पारंपरिक कला व ज्ञानसंपदा AI मध्ये वापरली जात असल्याने 'डिजिटल चोरी'चा धोका संभवतो. मानवविज्ञानाच्या दृष्टीने कलाकारांचे हक्क, सांस्कृतिक स्वायत्तता आणि कायदेशीर संरक्षण यांचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे.

**AI: संग्रहालये व सांस्कृतिक संस्था :**

AI मुळे संग्रहालये आणि सांस्कृतिक संस्था अधिक लोकाभिमुख बनत आहेत. आभासी संग्रहालये, AI मार्गदर्शित पर्यटन आणि डिजिटल प्रदर्शनांमुळे सांस्कृतिक वारसा सर्वसामान्यांपर्यंत पोहचवत असते. प्रतिमा ओळख व माहिती विश्लेषणामुळे संग्रहातील वस्तूंचे वर्गीकरण आणि अभ्यास सोपा झाला आहे. परंतु प्रत्यक्ष अनुभवाची जागा पूर्णतः आभासी माध्यमे घेऊ शकत नसल्याने AI चा वापर प्रवेश योग्यता वाढवण्यासाठी असावा, अनुभवाची मानवी खोली कमी करण्यासाठी नकोत.

**AI: सांस्कृतिक स्मरण** :

सांस्कृतिक स्मरण म्हणजे समाजाच्या सामूहिक अनुभवांची, परंपरांची आणि ऐतिहासिक जाणीवेची सातत्यपूर्ण प्रक्रिया होय. AI हे या स्मृतींचे जतन व पुनर्निर्मितीसाठी प्रभावी साधन ठरत आहे. लोककथा, मौखिक

इतिहास, लोकसाहित्य, पारंपरिक विधी आणि उत्सव यांचे डिजिटायझेशन करून AI त्यांचे विश्लेषण व वर्गीकरण करू शकते. यामुळे लुप्त होत चाललेल्या सांस्कृतिक घटकांचे संरक्षण शक्य होते. परंतु AI द्वारे सांस्कृतिक स्मृतींची मांडणी करताना संदर्भांचे अपप्रस्तुतीकरण होण्याचा धोका निर्माण होतो. म्हणूनच मानवी हस्तक्षेप आणि सांस्कृतिक संवेदनशीलता राखणे आवश्यक आहे.

**AI आणि भारतीय कला व संस्कृती :**

भारतीय कला आणि संस्कृती या विविधतेने परिपूर्ण असून त्यांचा ऐतिहासिक वारसा अत्यंत समृद्ध आहे. AI च्या साहाय्याने भारतीय शास्त्रीय संगीताचे राग विश्लेषण, हस्तकलेतील नमुन्यांचे डिजिटल दस्तऐवजीकरण व संवर्धन करता येते. तसेच संस्कृत, मराठी व इतर भारतीय भाषांतील हस्तलिखितांचे संगणकीय विश्लेषण शक्य झाले असल्याने, भारतीय सांस्कृतिक वारसा जागतिक पातळीवर पोहचविता येतो. मात्र, स्थानिक कलांच्या व्यापारीकरणाचा धोका टाळण्यासाठी सांस्कृतिक स्वायत्तता जपणे आवश्यक आहे. चित्रकला, संगीत, साहित्य आणि नाट्य या कला क्षेत्रांत AI चा वापर वाढत आहे. AI आधारित अल्गोरिदम चित्रे तयार करतात, संगीत रचना करतात आणि कविता लिहितात. यामुळे सर्जनशीलतेची संकल्पना बदलते. कला ही केवळ मानवी भावना व्यक्त करणारी प्रक्रिया नसून ती आता मानवीयंत्र सहनिर्मितीचे रूप धारण करत आहे. पण AI कलेला अर्थ देऊ शकत नसल्याने अर्थनिर्मिती ही मानवी संवेदनशीलतेवर अवलंबून असते.

**AI आणि मानवविज्ञान :**

इतिहास, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि तत्त्वज्ञान या मानवविज्ञान शाखांमध्ये AI मुळे संशोधनपद्धती अधिक व्यापक झाल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर डेटा विश्लेषण करून ऐतिहासिक प्रवाह, सामाजिक बदल आणि सांस्कृतिक नमुने ओळखता येतात. AI मुळे मानवविज्ञान अधिक आंतरशाखीय बनले आहे. पण संख्यात्मक विश्लेषणावर अतीभर दिल्यास मानवी अनुभवाची सूक्ष्मता दुर्लक्षित होण्याची शक्यता असते. AI आणि ज्ञाननिर्मिती यांचा संबंध 'सत्ता' या संकल्पनेशी निगडित आहे. मिशेल फुको यांच्या Power–Knowledge सिद्धांतानुसार ज्ञान हे सत्तेचे साधन असते. AI प्रामुख्याने ज्या डेटावर आधारित असतात, ते बहुधा प्रबळ समाज घटकांचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे दुर्बल व उपेक्षित संस्कृतींचे ज्ञान दुय्यम ठरण्याची शक्यता असते. मानवविज्ञानाच्या दृष्टीने AI कोणते ज्ञान निवडते, कसे विश्लेषित करते हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. म्हणूनच AI चा वापर करताना समावेशक आणि न्याय्य दृष्टिकोन आवश्यक ठरतो.

**नैतिक व तात्त्विक प्रश्न :**

AI चा वापर करताना सांस्कृतिक प्रतिनिधित्व, बौद्धिक संपदा, लेखकत्व आणि नैतिकता यांसंबंधी प्रश्न निर्माण होतात. AI निर्मित कलेचा निर्माता कोण, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. मानवविज्ञानाच्या दृष्टीने AI ही मूल्यनिरपेक्ष नसून ती मानवी दृष्टिकोन प्रतिबिंबित करते. त्यामुळे AI ची नैतिक चौकट निश्चित करणे आवश्यक आहे.

**AI: मानवाचा सहकारी :**

AI मानवाच्या सर्जनशीलतेचा अंत करत नसून त्याचा विस्तार करते. योग्य वापर केल्यास AI ही कला व संस्कृतीसाठी प्रभावी सहकारी बनू शकते. मानव हा अर्थ निर्माता आहे आणि AI ही प्रक्रिया सोपी करते. हा समतोल राखणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष (Conclusion) :**

AI आणि संस्कृती, कला व मानवविज्ञान यांमधील नाते हे परस्परपूरक स्वरूपाचे आहे. AI मुळे सांस्कृतिक वारसा जतन, कला निर्मिती आणि मानवविज्ञान संशोधनाला नवी दिशा मिळते. मात्र मानवी मूल्ये, सर्जनशीलता आणि नैतिकता यांना केंद्रस्थानी ठेवले नाही, तर तंत्रज्ञानाचा अतिरेक होण्याची शक्यता असते. म्हणूनच AI ला मानवविज्ञानाचा पर्याय न मानता फक्त एक प्रभावी साधन म्हणून स्वीकारणे हेच भविष्यकालीन सांस्कृतिक विकासासाठी उपयुक्त ठरेल.

**संदर्भ (Reference) :**


- Boden, M. (2016). AI: Its Nature and Future. Oxford University Press.
- Manovich, L. (2013). Software Takes Command. Bloomsbury.
- Halbwachs, M. (1992). On Collective Memory. University of Ch
- Benjamin, W. (2008). The Work of Art in the Age of Mechanical Reproduction. Penguin.
- UNESCO. (2021). AI and Cultural Heritage.
- Bhat, R. (2020). “Artificial Intelligence and Humanities.” Journal of Digital Humanities.
- Deshpande, S. (2019). संस्कृती आणि आधुनिकता. पुणे: कॉन्टिनेंटल.